# किमया

हिरवे हिरवे पाचू
ओतले कुणी खालती ?
कोवळी कोवळी पाने
लावली झाडांवरती?
फेकून दिला वाटते
हिरे माणकांचा ढीग
गवतांच्या फुलावर
त्यांची लागलीय रीघ
स्वातीचे मोती हे छान
पसरले भुईवर
सुगंधित वाऱ्यालाही
आला जुईचा बहर
सोन्याच्या मोहरा कुणी
दिल्या इकडे ठेवून
आंब्याच्या शेंड्यावरती
आल्यात वाटे फुलून
कोणी केली ही किमया
देवाने की धरतीने
नटे सारी वनराई
भन्नाट हिरवाईने

---

- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
ताळगाव गोवा